ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ६ मे, १९५९ | अंक १८

## विविध माहिती

**छोट्या उद्योगधंद्यांना उत्तेजन**—छोट्या उद्योगधंद्यांची वृद्धि व्हावी म्हणून कारखानाविषयक कायदे कितपत सैल करतां येतील हें पाहण्यासाठी मद्रास सरकारनें एका समितीची नेमणूक केली आहे. इमारतीसारख्या ज्या बाबींचा विशेष फायदा होत नाहीं त्या टाळतां येतील किंवा काय, ह्याचीहि तपासणी समिति करणार आहे.

**दिल्ली येथील गौळवाड्याचें काम**—दिल्ली येथें एक मध्यवर्ती गौळवाडा उभारण्याचें काम जोरानें चालू आहे. आसपासच्या भागांतून दूध गोळा करून तें थंडगार करण्याची व्यवस्थाहि पुरी होत आली आहे. ह्याच गतीनें काम चालू राहिल्यास १९५९ च्या स्वातंत्र्यदिनीं दिल्लीच्या नागरिकांना निर्जंतुक आरोग्यदायक दूध मिळूं लागेल.

**चित्रगृहें बांधण्यास सहकार्य**—भारतीय भांडवलाशीं सहकार्य करून सर्व देशभर चित्रगृहांची एक मालिका बांधण्याचा विचार अमेरिकेंतील सिनेमाच्या धंद्यांतील लोक करीत आहेत. अमेरिकन निर्मात्यांचें भारतांत अडवून ठेवलेलें जें भांडवल आहे त्याचा अशा रीतीनें उपयोग करण्याचा त्यांचा इरादा आहे. अमेरिकन चित्रपटांना दूरदर्शनकेंद्राशीं स्पर्धा करणें कठीण जात आहे.

**आयुर्वेदिक महाविद्यालयासाठी इमारत**—बडोदा येथील आयुर्वेदिक महाविद्यालयासाठी १,२५,००० रु. खर्चून एक मोठी इमारत बांधण्यांत येणार आहे. सयाजीराव डायमंड ज्युबिली ट्रस्टकडून इमारतीसाठी ५०,००० रु. देणगीदाखल मिळणार आहेत. सरकारनें विद्यालयासाठी १९५८-५९ सालीं २२,००० रुपयांची मदत दिली होती. चालू वर्षींहि ती चालू ठेवण्यांत येणार आहे.

**कापडाला वाढती मागणी**—अहमदाबाद येथील कापड-बाजारांत तेजीची लाट उसळली आहे. पंजाब, दिल्ली व उत्तर प्रदेश ह्या ठिकाणांहून कापडाची वाढती मागणी येत आहे. चालू महिन्यांत आतांपर्यंत ५०,००० पेक्षा अधिक कापडाच्या गाठीं उत्तर भारतांत रवाना झाल्या आहेत. मुंबई राज्याबाहेर कापड पाठविण्यास आतां वाहतूक-कंपन्यांना परवाना घ्यावा लागतो.

**ट्रॅक्टर्सच्या उत्पादनास प्रारंभ**—भारतामधील एका दारु-गोळ्याच्या कारखान्यांत ट्रॅक्टर्स बनविण्यांत येणार आहेत. ह्या ट्रॅक्टर्समधील कांहीं भाग तरी संपूर्णपणें देशांत बनविलेले असतील. पुढील महिन्यापासून उत्पादनास बहुधा सुरुवात होईल. त्याच-प्रमाणें, माती उकरून ती ढकलण्याच्या यंत्रांचेहि भाग तयार करण्यांत येऊं लागतील.

**इंडोनेशिआंत चलनवाढीचा उपद्रव**—इंडोनेशिआंत झालेल्या चलनवाढीमुळें रोजखपाच्या वस्तूंच्या किंमती दिवसा-गणिक झपाट्यानें वाढत चालल्या आहेत. वस्तूंच्या किंमतीचे जे निर्देशांक अधिकृतरीत्या प्रसिद्ध करण्यांत आले आहेत त्या-वरून मात्र गेल्या वर्षींच्या मानानें ह्या वर्षी राहणीच्या खर्चाचा निर्देशांक कमी झालेला दिसत आहे.

**भरती-ओहोटीच्या साह्यानें वीज**—भावनगर येथें येणाऱ्या भरती-ओहोटीचा फायदा घेऊन वीज उत्पन्न करण्या-च्या शक्यतेचा तज्ज्ञांकडून अभ्यास करण्यांत येत आहे. अशा तऱ्हेनें वीज निर्माण करण्यासाठी उपयुक्त असें हें जगांत दुसऱ्या क्रमांकाचें ठिकाण आहे. योजना शक्य झाल्यास १,७५,००० किलोवॅट वीज निर्माण होईल व सौराष्ट्रांतील बऱ्याच भागांचा वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटेल.

**रेल्वेची उतारूंची वहातूक**—भारतामधील रेल्वे रोज सुमारें ३८ लाख उतारूंना वाहून नेतात. ही उतारूंची संख्या दिल्ली व त्याच्या आसपासच्या खेड्यांतील लोकसंख्येच्या दुप्पट आहे. दर दहा दिवसाला ३·८ कोटी लोकांची ने-आण रेल्वे-कडून होत असते. बिहारची लोकसंख्या ३·८ कोटी आहे. म्हणजे दर दहा दिवसाला बिहारइतकी लोकसंख्या रेल्वेकडून हलविली जाते.

**तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची सोय**—तिसऱ्या वर्गांतील उतारूंना झोंपून प्रवास करतां यावा म्हणून नव्या प्रकारचे डबे बांधण्यांत येत आहेत. ते तयार झाल्यावर दूरचा प्रवास करणाऱ्या व वेगानें जाणाऱ्या गाड्यांना जोडण्यांत येतील. झोपण्याच्या सोयीसाठी सध्यां घेण्यांत येणारा ३ रुपये आकार रद्द करण्यांत येईल. मात्र ५०० मैलांपेक्षा अधिक प्रवास करणारांनाच त्याचा फायदा मिळेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## औद्योगिक शांतता राखण्याचा करार

त्रावणकोर येथील फर्टिलियझर्स अँड केमिकल्स लि., ह्या कंपनीचे चालक आणि कामगारवर्ग ह्यांच्या दरम्यान १९६१ सालअखेरपर्यंत औद्योगिक शांतता राखण्याचा करार करण्यांत आला आहे. करारांत चालक आणि कामगार ह्यांच्या दरम्यान उद्भवणाऱ्या विविध प्रकारच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची तरतूद करण्यांत आली आहे. १ जानेवारी, १९५९ पासून कराराच्या अटी अमलांत आणावयाच्या आहेत. ह्या कालखंडांत कंपनीनें टाळेबंदी करण्याचा हक्क आपण होऊन सोडून दिला असून कामगारांच्या संघटनेनेंहि संप करण्याच्या हक्कावर पाणी सोडलें आहे. कोणत्याहि प्रकारचें भांडण झालें तरी उभयपक्षांनीं ह्या साधनांचा उपयोग करावयाचा नाहीं असें ठरविलें आहे. कारखान्याची पुनर्घटना, विस्तार करण्याच्या योजना, कारभारी वर्ग व कामगार वर्ग ह्यांचीं संयुक्त मंडळें, कामगारांच्या दैनंदिन तक्रारींचें निवारण, इत्यादि बाबी समजूतदारपणें हाताळण्याची व्यवस्था करारांत करण्यांत आली आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या नौकरांच्या पगाराच्या व महागाई-भत्त्याच्या नव्या श्रेणी ठरविण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें कारखान्याला होणाऱ्या वद्व नफ्यापैकीं १५ टक्के नफा कामगारांना बोनस म्हणून मिळण्यास उभयपक्षांनीं संमति दिली आहे. कारखान्यांत सध्या दरसाल सुमारें ७२ हजार टन निरनिराळ्या प्रकारचीं खतें निर्माण करण्यांत येतात. कारखान्याच्या विस्ताराच्या योजना अमलांत आल्यावर उत्पादन दुप्पट होऊं लागेल. कारखान्यांत गुंतलेल्या भांडवलापैकी ५० टक्के भांडवल राज्य सरकारचें आहे. करारासंबंधीं बोलतांना कामगारसंघाचे अध्यक्ष म्हणाले कीं, हा करार करून कामगारांनीं आपल्या जबाबदारीच्या जाणीवेची साक्ष दिली आहे आणि धंद्यांच्या प्रगतीसाठीच आवश्यक तें वातावरणहि निर्माण केलें आहे.

## अल्प बचत योजनेच्या बाबतींत मुंबई राज्याची आघाडी

मुंबई राज्याचें अल्प बचतीचें उद्दिष्ट २६ कोटी रुपयांचें असून १९५८–५९ सालांत मुंबई राज्यानें सुमारें २३.०५ कोटी रुपयांची रक्कम अल्प बचत योजनेंत गुंतविली आहे. राज्यानें इतकी रक्कम गोळा करून आपल्या उद्दिष्टांपैकी सुमारें ९० टक्के उद्दिष्ट साध्य केलें आहे. मुंबई राज्यानें पुन्हां एकदां या बाबतींत आघाडी मारलेली आहे. पश्चिम बंगालचा दुसरा क्रमांक येत असून त्या राज्यानें गोळा केलेली रक्कम ८.९२ कोटी रुपये आहे. उत्तर प्रदेश व पंजाब यांचा त्या सालीं क्रमांक असून त्यांनीं अनुक्रमें ७.७७ कोटी व ५.२४ कोटी रुपयांची रक्कम अल्प बचत योजनेंत गुंतविली आहे. मुंबई शहरासाठी १९५८–५९ सालीं ११ कोटी रु. चें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. त्यांपैकी ८.४० कोटी रु. अल्प बचतींत गुंतविण्यांत आले. १९५७–५८ सालीं ७.३५ कोटी रु. जमा झाले होते.

राज्याच्या ४२ जिल्ह्यांकरितां ( बृहन्मुंबई वगळून ) एकूण १५ कोटी रु. चें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें व केवळ शेतकी आणि ग्रामीण भागांतून अंदाजें १३ कोटी रु. ( म्हणजे उद्दिष्टाच्या ८६ टक्के ) जमविण्यांत आले. शहर विभागांतून ७० टक्क्यांपेक्षा थोडी जास्त रक्कम जमविण्यांत आली होती. राज्यांमध्यें सदरहू कार्याकरितां १५,००० एजंटस काम करीत आहेत आणि देशामध्यें हें कार्य करणाऱ्या एजंटांच्या एकूण संख्येपैकी उपर्युक्त संख्या २५ टक्के इतकी आहे. मुंबई शहरांत १,२०० एजंटस काम करीत आहेत.

## स्पेशल बँक नोटा काढण्यास रिझर्व्ह बँकेला अधिकार

रिझर्व्ह बँकेला स्पेशल बँक नोटा काढण्याचा अधिकार देण्यासाठी रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल लोकसभेनें मंजूर केलें आहे. भारत सरकारला स्पेशल एक रुपयाच्या नोटा काढण्याचा अधिकारहि ह्या दुरुस्तीमुळें मिळणार आहे. ह्या दोन्ही नोटा भारतांत चालणार नाहींत; पण इतर बाबतींत बाकीच्या नोटांचीं बंधनें त्यांचेवर असतील. रिझर्व्ह बँकेच्या व सरकारच्या नोटांच्या परदेशांतील प्रसारावर बंधन घालणें, हा प्रस्तुत दुरुस्तीचा उद्देश आहे. इराणच्या आखाताचे आसपासच्या भागांतून येणाऱ्या चोरट्या सोन्यास त्यामुळें प्रतिबंध होईल, अशी अपेक्षा आहे.

**तांत्रिक शिक्षणाकडे अधिक लक्ष**—म्हैसूर राज्य सरकारनें तांत्रिक शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याचें ठरविलें आहे. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था काढण्यासाठी २.२७ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तिचा उपयोग करून राज्यांत तांत्रिक शिक्षण देणाऱ्या चार नवीन विविधोद्योगी शाळा व आणखी दोन एंजिनिअरिंग कॉलेजें स्थापन करण्यांत येणार आहेत.

**पाण्याच्या तुटवड्यामुळें गिरणी बंद**—उत्तर बेळगांव जिल्ह्यांत अवर्षणामुळें पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. बरीचशीं तळीं व विहिरी आटून गेल्या आहेत. पाण्याच्या टंचाईमुळें गोकाक मिलसमधील कामाच्या दोन पाळ्या बंद करण्यांत आल्या आहेत. पाळ्या बंद झाल्यामुळें १,००० कामगारांना रोजगाराला मुकावें लागलें आहे.

**खाजगी कारखान्यांत मिळणारे पगार**—सेवानिवृत्त झालेल्या सरकारी नौकरांना, विशेषतः लष्करांतील अधिकाऱ्यांना, मोठाले पगार देऊन कामावर नेमण्याच्या खाजगी कारखानदारांच्या पद्धतीबद्दल पंतप्रधान नेहरू ह्यांनीं तक्रार केली आहे. ही पद्धत ब्रिटन व अमेरिकेमधील असून ती भारतामधील परिस्थितीशीं पूर्ण विसंगत आहे, असें त्यांचें मत आहे.

**ब्रिटनमधील विजेचा पुरवठा**—१९६६ सालापर्यंत ब्रिटनला लागणाऱ्या विजेच्या पुरवठ्यापैकी एकचतुर्थांश पुरवठा अणुशक्तीच्या साह्यानें होऊं लागेल. १९७५ सालापर्यंत एक-द्वितीयांश वीज अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न केली जाईल. त्यामुळें ब्रिटनच्या कोळशाच्या खाणी बंद न पडतां कोळशाचा उपयोग अधिक प्रमाणांत रासायनिक धंद्यासाठी होऊं लागेल.

**जमीनधारणेची कमाल मर्यादा**—उत्तर प्रदेश सरकार जमिनीच्या मालकीबद्दल जो कायदा करणार आहे त्यांत पांच माणसें असलेल्या कुटुंबाच्या प्रमुखाच्या मालकीची जास्तींत जास्त ४० एकर जमीन असावी अशी तरतूद करण्यांत येणार आहे. तथापि डोंगराळ जमीन अगर कमी-अधिक प्रतीची जमीन ह्यांच्या अनुरोधानें विभागशः जमीनमालकीच्या मर्यादेंत थोडाबहुत बदल करण्यांत येणार आहे.

**योग्यावर वैद्यकीय प्रयोग**—दिल्ली येथील एका वैद्यकीय संशोधन करणाऱ्या संस्थेनें प्राणवायूच्या अपुऱ्या पुरवठ्याचा मानवी शरीरावर काय परिणाम होतो ह्याचा प्रायोगिक अभ्यास केला. एका कांचेच्या पेटींत ३४ वर्षांच्या एका योग्याला बसविण्यांत आलें. आंतील प्राणवायूचा पुरवठा इतका अपुरा होता कीं, सामान्य माणूस दगावला असता. ८ तासानंतर योग्यावर फारसा गंभीर परिणाम झाल्याचें दिसलें नाहीं.

# अर्थ

बुधवार, ता. ६ मे, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बोलपटांपासून परदेशीय चलनाची प्राप्ति

हिंदी बोलपटांच्या निर्यातीमुळें आतां परदेशीय चलनाची बरीच प्राप्ति होऊं लागली आहे. १९५८ सालीं परदेशीं निर्यात करण्यांत आलेल्या बोलपटांपासून भारताला १·१३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली. हिंदी बोलपट आयात करणाऱ्या देशांत पुढील देश आहेत. एडन, १,४२,००० रुपये; ब्रिटिश ईस्ट आफ्रिका १३,७०,००० रुपये; ब्रह्मदेश, १७,५६,००० रुपये; सीलोन, २४,८७,००० रुपये; मलाया, १७,९७,०००. वरील देश पौंडाच्या कक्षेंतील आहेत. ब्रिटन, पाकिस्तान आणि घाणा ह्या पौंडाच्या कक्षेंतील देशांनींहि भारतीय चित्रपट आयात करून अनुक्रमें,९२,०००, २,५७,००० व १,१७,००० रुपयांचें परदेशीय चलन उपलब्ध करून दिलें. बिगर पौंडी कक्षेच्या विभागांतील ज्या देशांनीं हिंदी बोलपट आयात केले ते असे : कांबोडिआ, १,०२,००० रुपये; इंडोनेशिआ, ६,२५,००० रुपये; इराण, २,४७,००० रुपये; इस्राइल १,६८,००० रुपये; टँजिअर, १,२१,००० रुपये; आणि सयाम १,२६,००० रुपये. बोलपटांची निर्यात करून भारताला परदेशीय चलनाची प्राप्ति मोठ्या प्रमाणावर होऊं शकेल हें जाणून मध्यवर्ती सरकारनें फिल्म्सच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी एका कौन्सिलची स्थापना केली आहे. चित्रपटांच्या निर्मितीच्या बाबतींत भारताचा अनुक्रम जगांत बराच वर लागतो. फक्त जपानच भारतापेक्षा अधिक बोलपट निर्माण करतो. भारतांत चित्रपटनिर्मितीच्या सुमारें २६० कंपन्या आहेत. चित्रपटांच्या वितरकांची संख्या १,१७५ आहे आणि चित्रपटगृहांची संख्या ४,२८९ आहे. गेल्या वर्षी भारतांत २९५ चित्रपट तयार करण्यांत आले. त्यांपैकीं ११६ हिंदी, ६१ तामीळ, ४५ बंगाली ३६ तेलगू १६ मराठी आणि ११ कानडी होते.

---

## टाइपरायटर्स तयार करण्याचा धंदा

भारतांत टंकलेखन यंत्रांची टंचाई निर्माण होण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. देशांतील टंकलेखन यंत्रांचें उत्पादन व त्यांची आयात ह्यांच्या आंकड्यांवरून ही गोष्ट उघड दिसून येत आहे. भारतांत १९५८ सालीं १५,८४६ टंकलेखन यंत्रें तयार करण्यांत आलीं. वास्तविक दरसाल ३३,००० यंत्रें तयार करण्याची उत्पादनक्षमता देशांतील कारखान्यांजवळ आहे सध्यां, टंकलेखन यंत्रें तयार करणारे तीन कारखाने आहेत; रेमिंगटन रँड, राजच्या कॉर्पोरेशन आणि गोद्रेज. अलीकडे कलकत्ता येथें ब्लॅकवुड कंपनीला सालीना १२,००० टंकलेखन यंत्रें तयार करण्याचा परवाना देण्यांत आला आहे. ह्या चवथ्या नव्या कारखान्यामुळें भारतामधील टंकलेखन यंत्रें तयार करणाऱ्या कारखान्यांची उत्पादनक्षमता दरसाल ४५,००० पर्यंत वाढली आहे. ह्या नव्या कारखान्याला परवाना देण्यास काय कारण झालें तें समजण्यास मार्ग नाहीं. कारण, आधींच चालू असलेल्या तीन कारखान्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता अद्याप कारणीं लागलेली नाहीं. कदाचित् ब्लॅकवुड कंपनी आपली सर्व उत्पादनक्षमता त्वरेनें उपयोगांत आणील अशी अपेक्षा असावी. टंकलेखन यंत्रें व त्यांचे सुटे भाग ह्यांची आयात झपाट्यानें कमी होत आहे. १९५८ सालीं भारतानें अवघ्या २,८२५ यंत्रांची आयात केली. १९५७ सालीं ह्याच्या सातपट म्हणजे सुमारें २०,९८२ यंत्रांची आयात करण्यांत आली होती. टंकलेखन यंत्रास लागणारे सुटे भाग व इतर सामुग्री ह्यांची आयात मात्र बऱ्या प्रमाणांत करण्यांत आली. ह्या सामुग्रीची किंमत सुमारें २६ लाख रुपये झाली. भारतामधील कारखान्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता कारणीं लावण्यासाठी ह्या सामुग्रीची आयात वाढविण्याची जरूरी आहे. नाहीं तर यंत्रांचा काळा बाजार होण्याची शक्यता आहे.

---

## नव्या युद्धापासून बचावाची तयारी

जगांत तिसरें महायुद्ध झालें तर त्यांत अणुबाँबचा उपयोग करण्यांत येईल आणि निदान युरोप तरी विध्वंसाच्या खाईत लोटलें जाईल. १९६२ सालीं रशिआ व अमेरिका ह्यांच्या दरम्यान महायुद्ध होण्याचीं भाकितें फलज्योतिषी वर्तवीत आहेत. हा संभाव्य विध्वंस टाळावा म्हणून युरोपांतील राष्ट्रें आपआपल्या परीनें बचावाच्या योजना आंखीत आहेत. स्वीडन हा देश डोंगराळ असल्यानें तेथील पर्वतांच्या रांगा दळणवळणाच्या व शेतीच्या दृष्टीनें उपद्रवकारक ठरतात. पण आतां अणुबाँबच्या साह्यानें लढल्या जाणाऱ्या युद्धांत ह्याच पर्वतांच्या कठीण पोटाचा चांगला उपयोग करून घेतला जाईल. स्वीडनमधील बहुतेक सर्व मोठ्या शहरांतील लोकसंख्या राहूं शकेल इतक्या मोठ्या गुंफा त्या त्या शहरांच्या नजीक खोदण्यांत आलेल्या आहेत. त्याशिवाय प्रत्येक घराच्या खालीं सुरक्षित आश्रयस्थान असलें पाहिजे असा नियम करण्यांत आला आहे. स्टॉकहोम शहराच्या नागरिकांसाठी अशा प्रकारचें पर्वताच्या पोटांतील आश्रयस्थान तयार करण्यांत आलें आहे. ह्या ठिकाणीं शांततेच्या काळांत ५०० मोटारी राहूं शकतील. युद्ध झालेंच तर तेथें २०,००० लोकांची निवाऱ्याची सोय होईल. आश्रयस्थानाच्या वरती ६० फूट जाडीचा पक्क्या दगडाचा थर आहे. त्यामुळें अणुबाँबपासूनहि धोका उत्पन्न होणार नाहीं. ह्या आश्रयस्थानांत जाण्यास जे बोगदे ठेवण्यांत आले आहेत त्यांना मोठे कोन ठेवण्यांत आलेले आहेत. त्यामुळें अणुबाँबच्या स्फोटानंतर उत्पन्न होणाऱ्या हवेच्या लाटा आंत जाणार नाहींत. शिवाय लाटा थांबविण्यासाठी कित्येक फूट जाड अशीं दारें बसविण्यांत आलीं आहेत. भारतांत आध्यात्मिक चिंतनासाठी हजारों वर्षांपूर्वी कलापूर्ण गुंफा खोदण्यांत आल्या. युरोपमधला सुधारलेला माणूस स्वसंरक्षणासाठी भुयारें खणीत आहे.

---

# MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 31-12-1957 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 89,34,807 | In hand and with Reserve Bank and State Bank of India ( Including Foreign Currency Notes ) ... | | 1,14,08,795—92 |
| | **2. Balances with Other Banks** ( In current account ) | | |
| 6,62,987 | ( i ) In India ... | 8,75,082—65 | |
| Nil | ( ii ) Outside India ... | Nil | 8,75,082—65 |
| 92,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 76,00,000—00 |
| | **4. Investments :** Securities—At or below redemption value : | | |
| | ( i ) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities, including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these, Securities of the face value of Rs.1,23,99,200/- are with Banks for Over-draft and other arrangements. ) ... | | |
| | ( Market value Rs. 4,64,93,958-12 ) ... | | |
| 2,41,34,391 | ( Face value Rs. 4,76,19,845-00 ) ... | 4,61,24,491—27 | |
| | (ii) Shares : At or below cost. | | |
| | Ordinary Shares (fully paid-up) (Market value Rs. 1,37,327-70) Rs. 1,30,254-02 | | |
| | Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 6,91,304-40 ) Rs. 6,84,898-80 | | |
| 5,13,523 | Ordinary shares (partly paid-up) (Market value Rs. 75,306-00) Rs. 67,368-75 | 8,82,521—57 | |
| 8,36,820 | (iii) Debentures or Bonds : At cost (Market value Rs. 11,37,585-00) ... | 11,32,820—00 | |
| Nil | (iv) Gold ... | Nil | 4,81,39,832—84 |
| 2,54,84,733 | | | |
| | **5. Advances** ( Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ) | | |
| | (1) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 3,68,58,832 | ( i ) In India ... Rs. 4,06,92,788-57 | | |
| Nil | ( ii ) Outside India ... Rs. Nil | 4,06,92,788—57 | |
| | (2) Bills discounted and purchased ( Excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 10,17,210 | ( i ) Payable in India... ... Rs. 13,56,006-68 | | |
| Nil | ( ii ) Payable outside India ... Rs. Nil | 13,56,006—68 | 4,20,48,795—25 |
| | **Particulars of Advances** | | |
| 3,23,21,004 | ( i ) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 3,52,67,171—61 | |
| 16,88,654 | ( ii ) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 30,61,311—68 | |
| 38,66,384 | ( iii ) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtor ... | 37,20,311—96 | |
| Nil | ( iv ) Debts considered doubtful or bad, not provided for | Nil | |
| 3,78,76,042 | | 4,20,48,795—25 | |
| 5,69,220 | ( v ) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 6,88,169—97 | |
| 26,93,888 | ( vi ) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of Private companies, as Members. ... | 20,20,100—66 | |
| 5,69,220 | ( vii ) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 6,90,953—83 | |
| | Carried over ... | | 11,00,72,506—66 |

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1957 Rupees | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought forward ... | | 12,31,22,274—44 |
| | **10. Contingent Liabilities** | | |
| 1,54,550 | On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company. ... | 1,54,050—00 | |
| | *Note:*—Provision in respect of future gratuity to the staff has not been made, the liability for which has not been ascertained. | | |
| 9,27,56,560 | Total Rs. ... | | 12,31,22,274—44 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER, 1958.

| 31-12-1957 Rupees | EXPENDITURE | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 15,67,056 | 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | | 22,23,035—04 |
| | 2. Salaries and Allowances and Provident Fund : | | |
| 23,200 | Manager ... | 25,500—00 | |
| 9,17,795 | Others. ... | 11,86,709—83 | 12,12,209—83 |
| 11,075 | 3. Directors and Local Committee Members' Fees and Allowances ... | | 10,750—00 |
| 1,07,596 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 1,35,602—04 |
| 4,057 | 5. Law Charges. ... | | 5,490—13 |
| 75,091 | 6. Postage, telegram, stamps and telephone. ... | | 95,059—01 |
| 3,300 | 7. Auditors' fees including travelling expenses ... | | 3,300—00 |
| 71,838 | 8. Depreciation on and repairs to the Banking Company's Property. ... | | 85,287—56 |
| 1,20,688 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,25,014—76 |
| Nil | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. | | Nil |
| | 11. Other expenditure. ... | | |
| 65,944 | Sundry Charges. ... | 72,419—82 | |
| 22,745 | Travelling and Conveyance. ... | 31,669—94 | 1,04,089—76 |
| 4,69,047 | 12. Balance of Profit (subject to taxation) carried to Balance Sheet. ... | | 5,56,435—92 |
| 34,59,432 | Total Rs. ... | | 45,56,274—05 |

| 31-12-1957 Rupees | INCOME (Less provisions made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 30,06,454 | 1. Interest and Discount. ... | | 39,57,131—37 |
| 3,87,429 | 2. Commission, exchange, brokerage. ... | | 5,25,932—27 |
| 16,603 | 3. Rents (Less taxes and other charges) ... | | 16,982—77 |
| Nil | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserve or any particular fund or account). ... | | Nil |
| Nil | 5. Net Profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserve or any particular fund or account) ... | | Nil |
| Nil | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets ... | | Nil |
| | 7. Other receipts. ... | | |
| 584 | Transfer fees ... | 426—75 | |
| 48,362 | Lockers rental ... | 55,800—89 | 56,227—64 |
| 34,59,432 | Total Rs. ... | | 45,56,274—05 |

## STATEMENT PURSUANT TO SECTION 212 OF THE COMPANIES ACT, 1956:

(a) The Bank's interest in its Subsidiary, The Maharashtra Executor and Trustee Company Private Ltd., as at 31st December, 1958 comprised 2,420 shares out of 2,500 shares of the face value of Rs. 100/- each of which Rs. 50/- has been paid up.

(b) The Profits of the said Subsidiary Company for the year ended 31st December, 1957 have been carried forward in the books of the Subsidiary Company. The undistributed balance of profit of the Subsidiary Co. amounting to Rs. 1,493-12 nP., has been carried forward in the accounts of the Subsidiary Company.

(c) The net aggregate amount of Rs. 20,635-31 nP. received as dividends from the Subsidiary Company for its previous financial years since its inception as a Subsidiary Company have been dealt with in the Profit and Loss Account of the Bank in the relevant years.

*POONA CITY,*
*29th January, 1959*

C. V. Joag, *Manager*
P. V. Agashe, *Accountant*

V. P. Varde, *Chairman*
N. G. Pawar,
D. K. Sathe,
F. D. Pudumjee,
M. V. Shah,
B. M. Gupte,
M. B. Jambhekar,
M. S. Parkhe, *Directors*

# MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 31-12-1957 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 11,00,72,506—66 |
| 30,01,379 | (viii) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 32,58,456—98 | |
| 42,541 | (ix) Due from Banking Companies ... | 5,17,163—36 | |
| | **6. Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | |
| 80,03,847 | (i) Payable in India ... | 93,83,278—22 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 93,83,278—22 |
| 3,96,373 | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per Contra :** ... | | 8,28,508—00 |
| | **8. Bank's Premises :** Less depreciation. ... | | |
| | Cost as at 31st December, 1957 ... | 8,69,854—95 | |
| | Additions during the year ... | Nil | |
| | | 8,69,854—95 | |
| 7,87,370 | Less total depreciation to-date ... | 1,01,484—95 | 7,68,370—00 |
| | **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault Etc.** | | |
| | Less Depreciation : | | |
| | Cost as at 31st December, 1957 ... | 8,02,726—49 | |
| | Additions during the year ... | 87,935—33 | |
| | | 8,90,661—82 | |
| 5,76,422 | *Less* : Total depreciation to-date ... | 2,81,384—26 | 6,09,277—56 |
| | **10. Other Assets including Silver** | | |
| 2,699 | Stamps on hand ... | 3,988—26 | |
| 2,87,053 | Tax paid in advance and at source ... | 6,98,979—38 | |
| 1,63,105 | Interest accrued on investments (less tax) ... | 3,65,383—20 | |
| 2,21,122 | Sundry advances ... | 2,31,983—16 | |
| 1,21,000 | Shares of the Maharashtra Executor and Trustee Co. Private Limited (Partly paid-up) ... | 1,21,000—00 | 14,21,334—00 |
| 7,94,979 | | | |
| 39,000 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** (Estimated Realisable value Rs. 39,000/-) ... | | 39,000—00 |
| 9,27,56,560 | Total Rs. ... | | 12,31,22,274—44 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Limited as at 31st December, 1958 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the returns of 11 branches audited by other Auditors and the unaudited returns from 33 other branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of Section 211 and Section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the sixth Schedule of the Companies Act, 1956. The accounts are, therefore, drawn up in conformity with forms A & B of the third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) the transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) in our opinion, proper books of account as required by law have been kept by Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the Bank; (d) the Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) in our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1958, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona City,
29th January, 1959.

Kulkarni and Khanolkar.
Chartered Accountants.

G. D. Apte, & Co.
Chartered Accountants.

# The Bank of Maharashtra, Ltd. Poona 2.

## 23rd Report of the Directors

*[23rd Report of the Directors submitted to the shareholders at the Annual General Meeting held at the registered office of the Bank, Maharashtra Bank Building, 1177, Budhwar Peth, Poona City on Thursday, the 5th March, 1959 at 4 P. M. (S. T.)].*

Your Directors beg to submit the Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December, 1958, duly certified by the Auditors.

It will be seen that the transactions of the Bank during the year under report, after meeting all expenses and after providing Rs. 1,10,000/- for payment of Bonus to Staff and after making usual and necessary provisions, resulted in a net profit of

| | | |
|---|---|---|
| ... ... ... | | Rs. 5,56,435-92 |
| After transferring out of the current year's profits: | | |
| To Reserve Fund | Rs. 1,50,000-00 | |
| To Provision for Taxation ... | Rs. 2,50,000-00 | Rs 4,00,000-00 |
| there remains a balance of ... | | Rs. 1,56,435-92 |
| Adding thereto ... ... ... | | Rs. 36 097-83 |
| the balance brought forward from the previous year, the amount available for distribution is ... ... ... | | Rs. 1,92,533-75 |
| which your Directors recommend be appropriated as under: | | |
| To pay dividend on 64,000 shares for the year ended 31st December, 1958 at 6¼% P. A., free of Income-tax on the paid up amount the of shares, pro-rata ... | | Rs. 1,53,194-53 |
| Carry forward to next year's account ... ... ... ... | | Rs. 39,339-22 |
| | | Rs. 1,92,533-75 |

—The business of the Bank during the year under report has shown satisfactory progress. Investments in securities have been considerably strengthened this year and you will note that the market value of the securities held is more than the cost.

As informed previously, three Calls in respect of the Share Capital were made up to the end of December, 1958. The Remaining two Calls are payable during this year. The paid-up Capital, at the end of 1958, stood at Rs. 25,22,340/- and the Reserves were Rs. 13,00,000/-. The Bank's shares are now officially quoted on the Bombay Stock Exchange.

A Branch at Parali-Vaijanath (Marathwada), two sub-branches in Bombay City and three sub-branches in Poona City were opened during the year under report. The total number of Branches is now 44. All branches are making good progress.

The Directors thank the members of the Local Advisory Committees at the branches for their guidance to our Agents.

The Directors regret to have to report the sad and untimely death of Shri G. D. Apte after a short illness. He was one of the joint Auditors of the Bank since its inception until he retired a year ago.

The Balance Sheet and Directors' Report of the Trustee Company are attached.

Under Article 99 of the Articles of Association Shri D. K. Sathe, Shri F. D. Pudumjee and R. B. M. B. Jambhekar retire by rotation. They are eligible and offer themselves for re-election.

You are requested to appoint Auditors for the current year and fix their remuneration.

For and on behalf
of the Board of Directors

C. V. Joag, *Manager.* V. P. Varde, *Chairman.*

POONA CITY,
29th January, 1959.

**विकाऊ अणुविच्छेदन भट्टी**—शिकॅगो विद्यापीठानें २०० टन वजनाची एक अणुविच्छेदनाची भट्टी विकाऊ आहे अशी जाहिरात दिली आहे. ह्या भट्टीला १,००,००० डॉलर्सपर्यंत किंमत येईल असा अंदाज आहे. विद्यापीठ आपल्या अणुविषयक संशोधनासाठी अधिक मोठ्या भट्टीचा उपयोग करूं लागल्यानें पहिल्या छोट्या भट्टीचा आतां उपयोग नाहीं.

**देवीच्या लसीची देणगी**—सिंगापूरमधील देवीची सांथ मलायांत पसरूं नये म्हणून तेथील सरकारनें देवीची लस टोंचण्याची मोहीम हातीं घेतली आहे. ह्या कामीं लागणारी लस पुरेशी नसल्यामुळें सरकारनें भारताकडे लसीची मागणी केली होती. त्याप्रमाणें भारत सरकारनें विमानानें लस पाठविण्याची व्यवस्था तातडीनें केली.

**सौराष्ट्रामधील कामगारांची सोय**—सौराष्ट्रामधील कामगारांची राहण्याची सोय करण्यासाठी, मुंबई सरकारनें ५,२०० गाळे बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी सरकारला १६·१ रुपये खर्च येईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कामगारांसाठी बांधावयाच्या घरांच्या योजनेचाच हा एक भाग आहे.

**तांत्रिक शिक्षकांचें उच्च शिक्षण**—एंजिनिअरिंग व तंत्रविद्येच्या १५० भारतीय शिक्षकांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अमेरिकन विद्यापीठांत पाठविण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. शिक्षणास प्रारंभ १९५९ च्या सप्टेंबर महिन्यापासून होईल. सर्व उमेदवारांना अमेरिकेंत दोन वर्षें राहून शिक्षणक्रम पुरा करावा लागेल.

**सहकारी कारखान्यांना धोका**—श्रीरामपूर भागांतील उसाची फार मोठी लागवड विहिरीच्या पाण्यावर अवलंबून असते. कडक उन्हाळयामुळें विहिरी कोरड्या पडत चालल्यामुळें पिकाला धोका उत्पन्न झाला आहे असें समजतें. ह्या भागांतील प्रवरा, राहता व कारेगांव ह्या सहकारी कारखान्यांचा उसाचा पुरवठा त्यामुळें अनिश्चित होण्याचा संभव आहे.

**अकोल्याची सुधारणा**—अकोल्याची सुधारणा करण्यासाठी तेथील म्युनिसिपालिटीनें १९५९-६० सालच्या अंदाजपत्रकांत १० लाख रुपयांची तरतूद केली आहे. एक प्रसुतिगृह, दोन दवाखाने, तीन प्राथमिक शाळा, एक खुलें नाट्यगृह इत्यादि नवीन कामें हातीं घेण्याचा नगरपालिकेचा संकल्प आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.